राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / १४०७ / २०२४ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| सुजाता शिवाजी पगारे | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रावेत पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड | सहाय्यक पोलीस आयुक्त, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड |

( सुनावणी दिनांक - १६ / १२ / २०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. २७.०२.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " चुकीची व खोटी माहिती दिली " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत. तथापि त्यांचे लेखी निवेदन प्राप्त असून त्यामध्ये त्यांनी पुढील तारखेची विनंती केली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा संक्षिप्त तपशील |
|---|---|
| २२.०९.२०२३ | अर्जदार यांनी दि. ३१.०७.२०२३ रोजी व दि. ०७.०८.२०२३ रोजी केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कारवाई, जाबजबाब इ. माहिती. |

अपिलार्थी यांनी पुढील तारीख देण्याबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, " अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. १९.१०.२०२३ रोजीच्या पत्राने उत्तर देवून अपिलार्थी यांना एकूण २२ साक्षांकित प्रतींची माहिती दिली आहे. "

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की, " अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन दि. ३०.११.२०२३ रोजी जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध कागदपत्रांची पुन्हा पडताळणी करून काही कागदपत्रे दिली नसल्यास ती ८ दिवसात विनामुल्य पुरविण्यात यावी, असा निर्णय पारित केला आहे. "

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. १९.१०.२०२३ रोजीच्या पत्राने उत्तर देवून अपिलार्थी यांना एकूण २२ साक्षांकित प्रतींची माहिती दिली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेवून दि.३०.११.२०२३ रोजी चौकशी अहवालाची पडताळणी करून अपिलार्थी यांना यापूर्वी न देण्यात आलेली माहिती ८ दिवसात देण्याबाबत आदेश दिले आहे. आयोगास सादर केलेल्या विवरण पत्रामध्ये प्रथम अपिलीय आदेशानंतर केलेल्या कार्यवाही मध्ये "पडताळणी केली परंतु माहिती यापूर्वी पुरविण्यात आलेली होती " असे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि. १९.१०.२०२३ रोजीच्या पत्राने उपलब्ध माहिती दिली आहे. प्रकरणी नियमोचित कार्यवाही झाली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

जावक क्र. १४०७ / २०२४ / पुणे 2040/2026 दिनांक - 28/4/2026